WWW.LIVELAW.IN

FORM-1A

N.C.R.B. I.I.F.

0168584

पहिली खबर

FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District बृहन्मुंबई, पोलीस ठाणे Police Station ना.म. जोशी मार्ग, पहिली खबर क्र. FIR No. 367, वर्ष Year 2020, दिनांक Date 04/11/2020

2. (i) अधिनियम Act भा.दं.वि., कलमे Sections 353, 504, 506, 34

(ii) अधिनियम Act सार्वजनिक मालमत्ता नुकसानी प्रतिबंध कायदा 1984 कलम 3

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day बुधवार, तारीख पासून Date from 04/11/2020 वेळ Time 07:00 तारीख पर्यंत Date to 04/11/20 वेळ Time 08:15

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 04/11/2020 वेळ Time 09:30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 23/2020 तारीख Date 04/11/2020 वेळ Time 14:20

4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. पश्चिमेस 4KM, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. III

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव

Address of Occurrence Name ..... No. if any ..... Ward ..... Name of road .....

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..... गाव ..... तालुका ..... जिल्हा ..... राज्य .....

Nearest identifiable place Village Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..... तालुका ..... जिल्हा ..... राज्य .....

In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्रीमती सुजाता तानवडे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name गोपाळ तानवडे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 49 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No.

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..... दिल्याचा दिनांक Date of Issue ..... दिल्याचे ठिकाण Place of Issue ..... (f) व्यवसाय Occupation नोकरी वरिष्ठ पोलीस निरिक्षक

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ....., जनजात Sub-Caste .....

(h) पत्ता Address : प्लॉट नं. 504, गल्ली Ward ..... सर्हे नं. ..... घर / गाव नं. House/Name No. वृंदावन फ्लॉट्स फोन / मो. नं. Phone/Mo. No. एन्च पॅन नं. PAN No. ..... बॅजेस नं. Card No. चौगुले,

रस्त्याचे नाव Road ता. खालापूर जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place जि. रायगड गाव Village ....., पोस्ट Post ....., पो. स्टे. P. Stn. .....

तालुका Taluka ....., जिल्हा Dist. ..... राज्य State ..... सध्याचा पत्ता Present Address .....

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर दे गळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) अर्णब रंजन गोस्वामी, 2) सम्यक्रता अर्णब गोस्वामी, 3) अर्णब गोस्वामी यांचा मुलगा, 4) एक अनोळखी स्त्री व 5) एक अनोळखी पुरुष रा.कि. PV 1701/1702

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lys.)-2-2018-PA3-(K) 829

Patil
Inspector of Police
M ... Marg Police ...

Scanned by TapScanner

WWW.LIVELAW.IN

दि. 04/11/2020

मा.तील फिर्यादी नामे श्रीमती सुजाता गोपाळ तानवडे वय 49 वर्षे व्यवसाय वरिष्ठ पोलीस निरिक्षक नेमणूक रसायणी पो. ठाणे, जि. रायगड यांचा स्वतंत्र कागदावर सविस्तर नोंदविलेला जबाब सोबत जोडून गुन्हातील प्रथम खबरी अहवाल सेवेशी सादर आहे.

समक्ष

Nakashikar
(निखील शेळके)
परि. पोलिस उपनिरिक्षक
ना.म. जोशी मार्ग पो. ठाणे,
मुंबई.

4/11/2020
सुजाता गो तानवडे
पो. नि वरिष्ठ
रसायनी पो. ठे
जि - रायगड

TRUE COPY

Patil
Inspector of Police
M Jawahar Marg Police Stn
MUMBAI

Scanned by TapScanner

WWW.LIVELAW.IN

पोलीस निरीक्षक, ना.म.जोशी

दि 04/11/2020

जबाब

श्रीमती सुजाता गोपाळ तानवडे, वय 49 वर्षे, व्यवसाय नोकरी, रा ठि

आधार नं

मी वरिलप्रमाणे असुन दर नमुद पत्यावर माहे ऑगस्ट 2019 पासुन भाडेतत्वावर कुटुंबियांसह राहण्यास आहे. मी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सन 1996 साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उप निरिक्षक या पदावर सरळ सेवा परिक्षेअंतर्गत भरती झाले असुन माहे जुलै 2019 पासुन वरिष्ठ पोलीस निरिक्षक या पदावर रसायनी पो ठाणे जि. रायगड येथे कार्यरत आहे.

दि 03/11/2020 रोजी मा अप्पर पोलीस अधिक्षक रायगड यांनी आम्हांस एका कारवाईकरीता जायचे आहे म्हणुन आपण आपल्याबरोबर महिला पोलीस अंमलदार यांना घेवुन खारपाडा येथे दि 04/11/2020 रोजी रात्रौ 03.00 वा आम्हांस रिपोर्ट करा असे सांगितले .त्यानंतर आम्ही आमचेकडील सरकारी वाहनाने महिला पोलीस अंमलदार यांचेसमवेत दि 04/11/2020 रोजी 03.00 वा मा अप्पर पोलीस अधिक्षक श्री सचिन गुंजाळ सो यांना नमुद ठिकाणी रिपोर्ट केला. त्यानंतर आम्ही व आमचे समवेत पोलीस उप अधिक्षक श्री पाटील, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक जमिल शेख, सपोनि क्रांती पाटील, पोलीस नाईक बक्कल नं 1200 /आर आर कुथे, अलिबाग रायगड तसेच स्टाफ असे खारपाडा येथुन शासकिय वाहनाने निघालो. मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री गुंजाळ यांनी आम्हांस अलिबाग पो. ठाणे गुन्हा क्र. 59/2018 कलम 306, 34 भादवि या गुन्हयातील पाहिजे आरोपी अर्णब रंजन गोस्वामी यांना सदर गुन्हयात अटक करणेकरीता तुम्हांला पोलीस उपअधिक्षक प्रविण पाटील यांचे नेतृत्वाखाली काम करावयाचे आहे असे सांगितले. सदर पथकात सी आय यु ऑपरेशन्स गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक श्री कोतवाल, सपोनि श्री सचिन वाजे, सपोनि काझी व महिला सपोनि किर्ती माने यांचा सहभाग असल्याचे सांगितले व या सर्वांची आम्हांस औळख करून दिली.पोलीस नाईक बक्कल नं 1200/आर आर कुथे, अलिबाग रायगड यांना संपुर्ण घटनेचे व्हिडीओ शुर्टींग करण्याच्या सुचना दिल्या.

दि 04/11/2020 रोजी पोलीस उप अधिक्षक श्री पाटील यांनी ना. म. जोशी मार्ग पो ठाणे स्टेशन डायरीत डायरी नं 05/2020 वेळ 06.55 वा नोंद केली व तेथुन आम्ही ना. म. जोशी मार्ग पो ठाण्याचे पोलीस निरिक्षक श्री सदानंद राणे, पोउपनि सपकाळ व त्यांचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार यांचेसमवेत नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी अर्णव गोस्वामी यांना अटक करणेकामी ते राहत असलेले पत्यावर बी 1701/1702, सतरावा माळा, रहेजा अटलांटीस, लोअर परेल, मुंबई या ठिकाणी रवाना झालो.

साधारण 07:00 – 07.15 वाजण्याचे सुमारास आम्ही वर नमुद पथकासमवेत अर्णब रंजन गोस्वामी यांचे निवासस्थानी पोहचलो. त्यांचे घराचा दरवाजा पथकाचे प्रमुख पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी नॉक केला. दरवाजा एका ईसमाने उघडला व पोलीस असल्याचे पाहुन बंद केला. त्यानंतर त्या ईसमाने आतुन तुम्ही कशासाठी आले आहात, मला त्रास देवु नका असे इंग्रजीमधुन पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांच्याशी बोलला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी सदर इसमास तुम्ही अर्णब गोस्वामी आहात का असे इंग्रजीत विचारले व दार उघडण्यास विनंती केली. त्यावर आतील इसमाने तो अर्णब असल्याचे सांगितले त्यानंतर पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी आतील इसमास ज्याने स्वत:चे नाव अर्णब गोस्वामी असल्याचे सांगितले होते त्यास त्याचे घरी येण्यामागचे कारण सांगितले. गोस्वामी यांनी थोड्या वेळात दार उघडतो असे पोलीस पथकास सांगितले परंतु त्यांचे घराचे दार त्याने बराच वेळ उघडले नाही. पुन्हा काही वेळ वाट बघुन पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी पुन्हा दार वाजवले त्यावर आतील इसमाने मला डिस्टर्ब करू नका मी थोडया वेळात दार उघडतो तुम्ही थांबुन रहा असे

TRUE COPY

Scanned by TapScanner

WWW.LIVELAW.IN

इंग्रजीत सांगितले. आम्ही स्वत: पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांचेसमवेत दरवाज्याचे जवळ असल्याने आतुन बोलणाऱ्या इसमाचा आवाज आम्हांस स्पष्ट ऐकु येत होता.

त्यानंतर काही वेळाने अर्णब गोस्वामी यांचे निवासस्थानाचे रहेजा अटलांटीस इमारतीचे 17 व्या माळ्यावर काही पत्रकार लिफ्टमधुन आले व लिफ्टमधुन त्यांनी आम्हा पथकाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यास सुरवात केली तेव्हा पो.नि. सदानंद राणे यांनी त्यांना आपण पोलीस कामात अडथळा आणु नये असे सांगितले नंतर ते खाली निघुन गेले. साधारण ४५ मिनीटांनतर 08:03 वाजता एका इसमाने घराचा दरवाजा आतुन उघडला. सदर इसमास पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अर्णब रंजन गोस्वामी असे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी त्यांना गु.र.क्र. 59/2018 कलम 306, 34 भादंवि मध्ये अटक करण्यास आलो आहे असे सांगताच अर्णब गोस्वामी यांनी घराचा दरवाजा ढकलुन तो लावण्याचा प्रयत्न केला. त्याच दरम्यान त्यांचे समवेत असलेल्या एका महिलेने मी त्यांची पत्नी साम्यब्रता गोस्वामी असल्याचे सांगितले व तिचे मोबाईलचा कॅमेरा चालु करुन त्यात व्हीडीओग्राफी करण्यास सुरवात केली. तसेच पोलीसांनी तिचे पतीस अटक करू नये म्हणुन पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांना व आम्हांस तसेच सपोनि किर्ती माने व क्रांती पाटील यांना धक्काबुक्की करण्यास सुरूवात केली. साम्यब्रता गोस्वामी हिने पोलीस पथकाबरोबर केलेल्या झटापटीत पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांची नेमप्लेट खाली पडली. त्यानंतर साम्यब्रता गोस्वामी हिनेच पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांना तुम्ही नेमप्लेट सुध्दा लावलेली नाही तुमचे नाव मला दिसत नाही असे हिंदीमध्ये दटावले. त्यानंतर अर्णब गोस्वामी याने मी पत्रकार आहे तुम्ही माझेवर असॉल्ट केला आहे असे मुद्दामुन मोठमोठयाने आरडाओरडा करण्यास सुरूवात केली. त्यास पोलीसांनी गु.र.क्र. 59/2018 कलम 306, 34 भादवि मध्ये अटक करू नये याकरीता पोलीस पथकास अडथळा निर्माण केला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी अर्णब रंजन गोस्वामी यास तुम्हांस अटक करण्यात येत आहे असे सांगितले व 08.15 वा. गु.र.क्र.59/2018 कलम 306,34 भादविमध्ये त्यास अटक केले.

अर्णब गोस्वानी यांना अटक केलेबाबत आम्ही त्यांची पत्नी नामे साम्यव्रता गोस्वामी हिस लेखी समजपत्र घेण्याची विनती केली व एका प्रतीवर त्यांना सही करण्यास सांगितले. श्रीमती साम्यब्रता गोस्वामी हिने प्रथम समजपत्र घेण्यास नकार दिला. त्यांनंतर तिने आमचेकडील समजपत्र घेतले परंतु त्यावर सही न करता स्वहस्ताक्षरात पोलीसांनी Forcibly Picked up him असे इंग्रजीत नमुद केले. त्यानंतर आम्ही त्यांना समजपत्रावर सही करा बाकी काहीही लिहु नका अशी विनंती केली त्यानंतर साम्यब्रता गोस्वामी हिने समजपत्रावर सही केली, दरम्यान अर्णब गोस्वामी याने कोणत्याही कागदावर सही करू नको असे साम्यब्रता गोस्वामी हिस ओरडुन सांगितले. त्यानंतर साम्यब्रता हिने समजपत्राचा सही केलेला भाग फाडला व सही नसलेला समजपत्राचा भाग आमच्याकडे दिला. आम्ही तिस तो भाग माझ्याकडे दया तो तुम्ही का फाडला असे विचारले असता साम्यब्रताने बसलेल्या ठिकाणचे मागील बाजुस उभ्या असलेल्या एका अनोळखी महिलेने व पुरूषाने साम्यब्रतास तो कागद आम्हांस देवु नये याकरीता चिथावणी दिली त्यानंतर साम्यब्रताने तो कागद तिचे स्वत: चे खिशात ठेवला व तेथुन उठुन घराचे दुसऱ्या रूममध्ये निघुन गेली. दरम्यान अर्णब गोस्वामी यांनी त्यांचे मुलास शुटींग कर माझेवर पोलीस हल्ला करीत आहेत व मिडीयावर लगेच बातमी देण्यास सांगितले. त्यांचे मुलाने देखील अर्णब गोस्वामी यास अटक होवु नये म्हणुन पोलीसांना धक्काबुक्की केली. पोनि कोतवाल यांनी आम्हांस सांगितले की,साम्यब्रता गोस्वामी हिने तिचेकडील समजपत्राचा सही केलेला भाग फाडुन तिचे घराचे गॅलरीतुन खाली फेकुन दिला आहे. सदर घटनेदरम्यान अर्णब गोस्वामी याने आम्हा पोलीस पथकास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन, 'मी पत्रकार आहे तुम्हा पोलीसांना पाहून घेईन' असे धमकावले.

(पुढे सुरु.....)

Scanned by TapScanner

WWW.LIVELAW.IN

श्रीमती सुजाता गोपाळ तानवडे यांचा दि. ०४/११/२०२० रोजीचा जबाब पुढे सुरु... (पृष्ठक्रमांक २)

.....

अर्णब रंजन गोस्वामी यांचे निवासस्थानी दाखल झाल्यापासुन ते त्यांना अटक करून रायगड अलिबाग येथील मा न्यायालयासमोर हजर करणेकरीता पोलीस वाहनांत त्यांना बसवे पर्यतचे छायाचित्रीकरण पोलीस नाईक बक्कल नं 1200 /आर आर कुथे ,अलिबाग रायगड यांनी व्हिडीओ कॅमेऱ्यात केले आहे.

साम्यब्रता गोस्वामी यांनी फाडलेला समजपत्राचा सही नसलेला अर्धवट भाग मी समक्ष सादर करीत आहे.

तरी आज दि 04/11/2020 रोजी गु.र.क्र. 59/2018 कलम 306, 34 भादवि मध्ये पाहिजे असलेला आरोपी नामे अर्णव रंजन गोस्वामी यांस अटक करणेकरीता पोलीस उपअधिक्षक श्री प्रविण पाटील हे पथकासमवेत त्यांचे निवासस्थानी बी 1701/1702, सतरावा माळा, रहेजा अटलांटीस, लोअर परेल, मुंबई येथे नामजोशी मार्ग पो ठाणे येथील स्टेशन डायरीत नोंद करून स्थानिक पोलीसांचे मदतीने साधारण 07.00 वाजण्याच्या दरम्यान गेले असता अर्णब गोस्वामी यांनी दरवाजा उघडुन पोलीस पथकास पाहुन पुन्हा दरवाजा लावुन घेतला व 08.15 वाजेपर्यत पोलीस पथकास त्याचे निवासस्थानाचे बाहेर तात्काळत उभे ठेवले. पोलीसांनी त्यास त्यांचे निवासस्थानी येण्याचे कारण सांगितले असता अर्णब गोस्वामी यांनी व त्यांचे पत्नी साम्यब्रता गोस्वामी व त्यांचा मुलगा तसेच इतर एक अनोळखी पुरूष व स्त्रीने पोलीस पथकास अर्णब गोस्वामी यांना गुन्हयात अटक होवु नये यासाठी धक्काबुक्की केली तसेच साम्यब्रता गोस्वामी हिने अर्णब गोस्वामी यांना अटक केली आहे याबाबत तिला दिलेल्या समजपत्रावर सही करण्यास नकार दिला तसेच सही केल्यानंतर अर्णब गोस्वामी यांचे सांगण्यावरून समजपत्राचा सही केलेला भाग फाडुन नष्ट करून सरकारी दस्तएवजाचे नुकसान केले आहे सदर घटनेदरम्यान अर्णब गोस्वामी याने आम्हा पोलीस पथकास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन, 'मी पत्रकार आहे तुम्हा पोलीसांना पाहून घेईन' असे धमकावले म्हणून माझी अर्णब रंजन गोस्वामी, त्यांची पत्नी साम्यब्रता गोस्वामी त्यांचा मुलगा, एक अनोळखी स्त्री व एक अनोळखी पुरुष यांचेविरुध्द सरकारतर्फे भा.दं.वि. कलम ३५३, ५०४, ५०६, ३४ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ कलम ३ अन्वये माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून त्याची प्रिन्टरच्या सहाय्याने प्रिन्ट काढली असता तो मी वाचून पाहिला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

4/11/2020

समक्ष

(निखिल शेळके)
परि. पोलीस-उपनिरीक्षक
ना.म.जोशी मार्ग पो.ठाणे, मुंबई.

TRUE COPY

Inspector of Police
M. M. Joshi Marg, Police Station
Mumbai

Scanned by TapScanner

दाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..... तात्काळे

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... –

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..... –

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

प्रतीत नमूद तारखेस वेळी व ठिकाणी प्रतीस कॉलम नं. 1 मधील आरोपी यांनी आपसात संगनमत करून अलिबाग पो. ठाणे हद्दीत मौजे दादर येथे राहते घरी गु.र.क्र. 53/2018 कलम 306, 34 भा.दं.वि. मा गुन्हातील पाहिजे आरोपी अमर रंजन गोस्वामी यास कामदेहीर अपक करणेकामी फिर्यादी व पयक्ष गेले असता कॉलम नं. 1 मधील आरोपी यांनी पाहिजे आरोपीस गुन्हात अपक होवू नये म्हणून फिर्यादी व पयकास धक्काबुक्की केली, आरोपीस अपक केलेबाबत समजपत्र फाडून सरकारी इस्तावेजाचे नुकसान केले आहे, नमूद पोलीस पयकास शिवीगाळ करून पत्रकार आहे तुम्हास पाहून घेईन अशी धमकी दिली म्हणून गुन्हा कलम 353, 504, 506, 34 भा.दं.वि. सह कलम 3 सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : प्रतिबंधक कायदा 1984 अन्वये गुन्हा नोंद: ..... पदि: पोउनि निखील रोठके

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ....., जिल्हा ....., राज्य .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)..... Rank..... No..... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to..... (3) Transferred to P. S. ..... District..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

4/11/2020

तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. 04.11.2020
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..... निखील रोठके
पदनाम Rank ..... पदि. पोलीस उपनिरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..... ना.म.जोशी मार्ग पो.ठाणे, मुंबई.
Posting
Code No. of I. O. .....

1. न्यायालयासं सादर केल्याची तारीख.....:
1. Date and time of submitted to the Court.

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक),
to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer),
4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
4. Inv. Officer, 5. Office Copy.

TRUE COPY

hment to item 7 of First Information Report

Scanned by TapScanner
WWW.LIVELAW.IN

WWW.LIVELAW.IN

General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

State (राज्य): महाराष्ट्र

District (जिल्हा): बृहन्मुंबई शहर

P.S. (पोलीस ठाणे): एन एम जोशी मार्ग

1. G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र,): 009

2. G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ): 04/11/2020 09:48 वाजता

3. G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार): अटक/शरण

4. Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी)): RoshanBharatRavrane /पोलीस उपनिरीक्षक

5. Case Type (प्रकरणाचा प्रकार) :

6. G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):

नमुद वेळी पोलीस निरीक्षक तानवडे ,रसायनी पो. ठाणे रायगड यांनी समक्ष येवुन निवेदन करतात की, दि. 04/11/2020 रोजी सकाळी 07:03 वा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री गुंजाळ, पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील, पोलिस निरीक्षक जमिल शेख, पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे, सपोनि क्रांती पाटील व स्थानिक पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक राणे, पोलीस उप निरीक्षक सपकाळ, सी आय यु ऑपरेशन्स गुन्हे शाखा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सचिन वाजे, पोलीस निरीक्षक श्री कोतवाल व इतर पोलीस अमंलदार या पथकाने श्री अर्णव रंजन गोस्वामी यांना अलीबाग पोलीस ठाणे गु.र.क्र.59/2018 कलम 306, 34 भादंवि . मध्ये अटक करणेकरीता त्यांचे राहते घरी, बी १७०१/१७०२, सतरावा माळा, रहेजा अटलांटीस, लोअर परेल, मुंबई येथे पोहचले. त्यांचे घराचा दरवाजा पोलीस उप. अधिक्षक प्रविण पाटील यांनी नॉक केला असता कोणीही आतुन दरवाजा उघडला नाही परंतु आतुनच तुम्ही कशासाठी आले आहात असे विचारले असता पोलीस उप अधिक्षक प्रविण पाटील यांनी त्यांना त्यांचे घरी येण्यामागचे कारण सांगितले. श्री गोस्वामी यांनी थोड्या वेळात दार उघडतो असे पोलीस पथकास सांगितले परंतु त्यांचे घराचे दार न उघडता पोलीसांना बाहेर एक तास ताटकळत ठेवले. त्यानंतर काही पत्रकार रहेजा अटलांटीस येथील 17 व्या माळ्यावर आले तेव्हा पो.नि. सदानंद राणे यांनी आपण पोलीस कामात अडथळा आणु नये असे त्यांना सांगितले त्यानंतर ते खाली निघुन गेले. साधारण 08:03 मिनीटांना श्री. गोस्वामी यांनी त्यांचे घराचा दरवाजा आतुन उघडला. त्यांना पोलीसांनी नमुद गुन्हायात अटक करु नये याकरीता पोलीसांना अटकाव केला व आत येवु दिले नाही.त्यानंतर श्री गोस्वामी यांना मा.sdpo सो पाटील यांनी पोलीसांना सहकार्य करण्याची विनंती केली. दरम्यान श्री गोस्वामी यांची पत्नी साम्यव्रता गोस्वामी हिने तिचे मोबाईलचा कॅमेरा चालु करुन त्यात व्हीडीओग्राफी करण्यास सुरवात केली.त्यादरम्यान मुद्दामुन श्री गोस्वामी हे आरडाओरडा करु लागले.08.15वा. गु.र.क्र.59/2018 कलम 306, 34 भादंवि मध्ये श्री गोस्वामी यांना अटक करत असलेबाबत मा. sdpo पाटील यांनी त्यांना सांगितले व 08:15 वा. श्री अर्णव रंजन गोस्वामी यांना अटक करण्यात आली. त्यांचे अटकेबाबत त्यांची पत्नी नामे साम्यव्रता गोस्वामी हिस लेखी समजपत्र दिले असता प्रथम त्यांनी ते घेण्यास नकार दिला . पोलीस निरीक्षक तानवडे यांनी त्यांना विनंती केल्या नंतर त्यांनी ते घेतले परंतु त्यावर सही न करता इतर माहिती स्वहस्ताक्षरात नमुद केली. आम्ही त्यांना समजपत्रावर सही करा अशी विनंती केल्यानंतर त्यांनी सही केली परंतु सही केलेल्या समजपत्राची सही केलेली बाजु फाडुन स्वत: कडे ठेवली. एकंदरीत या गुन्ह्यात गोस्वामी यांनी व त्यांचे पत्नीने तसेच त्यांचे मुलाने पोलीसांनी श्री अर्णव रंजन गोस्वामी यांना गु.र.क्र.59/2018 कलम 306, 34 भादंवि मध्ये अटक करु नये याकरीता पोलीस पथकास धक्काबुक्की करुन अडथळा केला याबाबत स्वतंत्र फिर्याद देत आहोत म्हणुन नोंद .

7. G.D. Subject (ठा. दै. चा विषय):

गु.र.क्र.59/2018 कलम 306, 34 भादंवि

8. Acts & Sections (अधिनियम आणि कलम):

Sr.No.	Acts (अधिनियम)	Sections (कलम)

Scanned by TapScanner

WWW.LIVELAW.IN

General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

State (राज्य): महाराष्ट्र

District (जिल्हा): बृहनमुंबई शहर

P.S. (पोलीस ठाणे): एन एम जोशी मार्ग

1. G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.): 023

2. G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ): 04/11/2020 14:20 वाजता

3. G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार): फौजदारी प्रकरण

4. Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी)): RoshanBharatRavrane /पोलीस उपनिरीक्षक

5. Case Type (प्रकरणाचा प्रकार) :

6. G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):

परि पोउनि शेळके निवेदन करतात की, तक्रारदार नामे श्रीमती सुजाता गोपाळ तानावडे ,वय49वर्षे रा,ठि रूम नं 504,वृदांवन प्लोरा सोसायटी एच विंग ,चांभार्ली . ता खालापुर .जि रायगड. व्यवसाय वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेमणुक रसायनी पो ठाणे,जि रायगड यांनी समक्ष पो ठाणेस उपस्थित राहुन फिर्याद दिली की, आज दि 04/11/2020 रोजी गु.र.क्र.59/2018 कलम 306, 34 भादवि मध्ये पाहिजे असलेला आरोपी नामे अर्णव रंजन गोस्वामी यांस अटक करणेकरीता फिर्यादी व पोलीस उपअधिक्षक श्री प्रविण पाटील हे पथकासमवेत अर्णब गोस्वामी यांचे निवासस्थानी बी 1701/1702, सतरावा माळा, रहेजा अटलांटीस, लोअर परेल, मुंबई येथे नामजोशी मार्ग पो ठाणे येथील स्टेशन डायरीत नोंद करून स्थानिक पोलीसांचे मदतीने साधारण 07.00 वाजण्याच्या दरम्यान गेले असता अर्णब गोस्वामी यांनी दरवाजा उघडुन पोलीस पथकास पाहुन पुन्हा दरवाजा लावुन घेतला व 08.15 वाजेपर्यत पोलीस पथकास त्याचे निवासस्थानाचे बाहेर ताटकळत उभे ठेवले. पोलीसांनी त्यास त्यांचे निवासस्थानी येण्याचे कारण सांगितले असता अर्णब गोस्वामी यांनी व त्यांचे पत्नी साम्यब्रता गोस्वामी व त्यांचा मुलगा तसेच इतर एक अनोळखी पुरूष व स्त्रीने पोलीस पथकास अर्णब गोस्वामी यांना गुन्हयात अटक होवु नये यासाठी धक्काबुक्की केली तसेच साम्यब्रता गोस्वामी हिने अर्णब गोस्वामी यांना अटक केली आहे याबाबत तिला दिलेल्या समजपत्रावर सही करण्यास नकार दिला तसेच सही केल्यानंतर अर्णब गोस्वामी यांचे सांगण्यावरून समजपत्राचा सही केलेला भाग फाडुन नष्ट करून सरकारी दस्तएवजाचे नुकसान केले आहे म्हणुन अर्णब रंजन गोस्वामी,त्यांची पत्नी साम्यब्रता गोस्वामी त्यांचा मुलगा, एक अनोळखी स्त्री व एक अनोळखी पुरूष यांचेविरूध्द फिर्यादी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने नामजोशी मार्ग पो ठाणे गु र क्र367/2020 कलम 353,504,506,34 भादवि सह कलम3 सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा 1984 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाची माहिती दिवसपाळी पोनि अहिरे व मा वपोनि थोरात सो व मध्य नियंत्रण कक्ष येथे दिले.

7. G.D. Subject (ठा. दै. चा विषय):

गु र क्र367/2020 कलम 353,504,506,34 भादवि सह कलम3 सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा 1984

8. Acts & Sections (अधिनियम आणि कलम):

Sr.No.	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भारतीय दंड संहिता १८६०	३५३
2	भारतीय दंड संहिता १८६०	५०४
3	भारतीय दंड संहिता १८६०	५०६
4	भारतीय दंड संहिता १८६०	३४
5	सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४	3

Scanned by TapScanner